# राष्टीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम युनिट नंदुरबार

**राष्टीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमातंगर्त राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती**

**योजनेचे नांव - राष्टीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम**

**कार्या लयीन यंत्रणा - जिल्हा हिवताप अधिकारी नंदुरबार**

**योजनेचा उदर्देश्य - या योजनेचा मुख्य उदेदश्य नागरी व ग्रामिण भागात डांसाचे निमुर्लन करण्यासाठी फवारणी करणे व घराघरी जाऊन हिवतापाचे रोगी आहे किवा नाहीत यांची चौकशी करणे व तसेच आढळुन आल्यास रक्ताचे नमुने तपासुन औषधोपचार करण्यात येतो.**

**1. <u>योजनेचे स्वरुप</u> - - राष्टीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम ही योजना केद्रशासन पुरस्कृत योजना असुन आता ही योजना जिल्हा स्तरीय योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आली आहे . या योजनेचे शिर्षक मागणी आर-1 2210 वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य 06 सार्वजनिक आरोग्य 01 05 हिवताप निमुर्लेन कायर्क्रम 22100611 असुन या योजनेतील साहित्य व सामुग्री खरेदीसाठी येणा-या खर्चातील 50 टक्के भाग केद्रशासन कडुन मिळतो.उर्वरित 50 टक्के खर्च राज्यशासन जिल्हा स्तरीय योजना निधीतुन करते व हा निधी जिल्हा नियोजन समितीकडुन देण्यात येतो आणि त्यांचा विनीयोग साधन सामुग्री खरेदीसाठी राज्यस्तरावरुन केला जातो व ही साधन साम्रग्री जिल्हयाना पुरविण्यात येते. या योजनेचे नियत्रंण राज्यस्तरावर मा-सह संचालक आरोग्य सेवा हिवताप व हत्तीरोग पुणे - 6 हे करतात व त्यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरावर या योजनेची अमंलबजावणी जिल्हा हिवताप अधिकारी हे मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. नंदुरबार यांच्या सहकार्याने व त्यांच्या मार्गदर्शना खाली करीत असतात.**

**<u>वैशिष्ठे</u> :-**

**1. हिवतापाने होणारे मृत्यु टाळणे.**

**2.औद्योगिक क्रांती व हरीत क्रांतीला हिवतापामुळे बाधा येऊ नये .**

**3. किटकनाशक फवारणी ऐवजी जैविक नियंत्रण पध्दतीवर भर देणे.**

**4. या योजनेला आतापर्यत मिळालेले यश टिकवुन ठेवणे.**

**5. उपलब्ध साधन सामुग्री ,मनुष्यबळ व निधी यांचा योग्य उपयोग करुन हिवतापाच्या प्रसाराला प्रभावीपणे आळा घालणे.**

## 2. योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले निकषः-

1. **प्रत्यक्ष सर्व्हेक्षण** :- आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत नेमुन दिलेल्या गांवाना पंधरवाडा गृहभेटी देतात.भेटीत सर्व घरांना भेटी देऊन तापाचा रुग्ण शोधणे.रुग्णाचा रक्तनमुना कांच पटटीवर घेणे व त्यास गृहित उपचार म्हणुन वयोगटाप्रमाणे क्लोरोक्विन गोळया देण्यात येतात. आरोग्य कर्मचा-यांने घेतलेला रक्तनमुना हा त्वरीत तपासणी अंती दुषित आढळलेल्या हिवताप रुग्णास आवश्यकतेनुसार क्लोरोक्विन व प्रायमाक्विन गोळयाचा त्वरीत उपचार देण्यात येतो.
2. **अप्रत्यक्ष सर्व्हेक्षण**:- जिल्हयातील सर्व प्रा.आ.केद्र ग्रामिण रुग्णालय ,कुटिर रुग्णालय ,नगर परिषद दवाखाना व जिल्हा पातळीवरील सर्व रुग्णालय येथे उपचारासाठी आलेल्या तापाचे रुग्णाचे रक्तनमुने घेतले जातात व रुग्णास वयोगटाप्रमाणे क्लोरोक्विन गोळयाचा डोस देण्यात येतो. या ठिकाणी घेण्यात येणारे रक्तनमुने प्रयोगशाळेत तपासले जातात व त्यात दुषित आढळुन आलेल्या रुग्णास आवश्यकतेनुसार क्लोरोक्विन व प्रायमाक्विन गोळयाचा त्वरीत समुळ उपचार देण्यात येतो तसेच संशयीत तापाच्या रुग्णास एक दिवशीय समुळ उपचारही देण्यात येतो.
3. **जीवशास्त्रीय उपाययोजना** :- किटकनाशक पावडर खर्चीक बाब असल्याने सद्या जैविक नियंत्रण पध्दतीवर जोर देण्यात येत आहे.

जिल्हयातील काही निवडक भागात विहिरी ,पाण्याच्या टाक्या,हौद,डबके, नदी नाले,इत्यादी ठिकाणी साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडण्यात येतात. गप्पीमासे हे डांसाच्या अळया खाणारे मासे आहेत व त्या योगे हिवताप प्रसारक डांसाचा नायनाट होतो. पर्यायाने हिवतापावर नियंत्रण ठेवता येते.

नंदुरबार जिल्हयात एकुण 237 गप्पीमासे पैदास केद्र कार्यान्वीत आहेत व 305 कायम् स्वरुपी डासोत्पत्ती स्थाने आहेत. ज्या ठिकाणी कायम स्वरुपी व हंगामी स्वरुपाची डासोत्पत्ती स्थाने आहेत अशा ठिकाणी डांसाच्या अळया खाणारे गप्पीमासे सोडण्याचे काम आरोग्य कर्मचारी व कार्यालयातील क्षेत्र कर्मचारी यांचे मार्फत युध्द पातळीवर सुरु आहे.

4. **<u>गोळया वाटप केंद्रे</u>:- जनतेचा हिवताप प्रतिरोध कार्यक्रमात सहभाग असावा म्हणुन जिल्हयात 5265 गोळया वाटप केंद्रे** आहेत त्यापैकी २६८८ गोळया वाटप क्रेद्र कार्यरत आहेत. **गांवातील शाळा,अंगणवाडी,ग्रामपंचायत,**आशा वर्कर,ट्रेन दाई इत्यादी ि ठकाणी क्लोरोक्विन **गोळयाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे ताप आलेल्या व्यक्तीस गृहित उपचार उपलब्ध करुन दिला जातो.**

5. **<u>किटकनाशक फवारणी</u> :- हिवताप उर्देकाच्या ठिकाणी तातडीची उपाययोजना म्हणुन केंद्रीय फवारणी व धुरळणी करण्यात येते.**

6. **<u>मजुर सर्व्हेक्षण</u> :- शेजारच्या राज्यातुन व जिल्हयातुन येजा करणा-या मजुरांवर लक्ष ठेवुन तापाचे रुग्णाचे रक्तनमुने घेऊन संशयीत तापाच्या रुग्णाचे समक्ष समुळ उपचार देण्यात येतो.**